श्री चंद्रेश्वर प्रभावळ

# चंद्रवाडी

# २४वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन

केपे २००१

९, १०, ११ नोव्हेम्बर

निज अश्विन कृ. ९, १०, ११ शके १९२३

संपादिका

**प्रा.सौ. आशा अशोक मणगुतकर**

# मुक्तीनंतरची गोमंतकीय मराठी कथा: एक आलेखन

◆ प्रा. बाळकृष्ण जी. कानोळकर ◆

गोमंतकीय कथालेखनाला आज उणीपुरी शंभर वर्षे झालेली आहेत. गोमंतकीय कथालेखन केंद्रवर्ती मराठी कथालेखनाला नेहमीच समांतर राहिलेले आहे. आधुनिक मराठी कथालेखनाचा प्रारंभ हरीभाऊ आपटे यांच्या काळात झाला. 'करमणूक' मासिकाने या कथेची पाठराखण केली. 'करमणूक कालखंड' असाच या काळाचा उल्लेख मराठी कथेच्या इतिहासात केला जातो. 'करमणूकी'च्या बरोबरीने 'बोध' करणे ही या कालखंडातील कथालेखनाची प्रमुख 'उद्दिष्टे' होती. गोमंतकीय कथालेखनाचा प्रारंभही याच कालखंडातला. करमणूक व बोध ही या कथेची व्यवच्छेदक लक्षणे मानली जातात. गोमंतकीय कथा देखील याला अपवाद ठरू शकली नाही. हिराबाई पेडणेकरांच्या 'माझे आत्मचरित्र' 'जुने पत्र' 'कमलकुमारी' व 'शेवटी प्रयत्न निष्फळ झाले' अशा चार कथा याच काळात प्रसिद्ध झालेल्या पहावयास मिळतात. मात्र त्यांच्या कथांचा संग्रह प्रसिद्ध झालेला नाही. ग.कृ. शिरसाट हे या कालखंडातील दुसरे एक प्रसिद्ध गोमंतकीय कथालेखक. त्यांच्या अनेक कथा या काळात प्रसिद्ध झाल्या. त्यांचा 'गद्यविलासिनी' हा कथासंग्रह १९१२ मध्ये मुंबईला प्रकाशित झाला. मराठीत कथासंग्रह काढण्याची प्रथा बहुधा याच पुस्तकाने सुरू केली असावी असे म्हणता येते / या कालखंडात इतरही गोमंतकीय लेखक कथालेखन करीत होते. परंतु त्यांचे कथालेखन त्रुटीत स्वरूपात होते. म्हणून त्यांची योग्य दखल वाङ्मयेतिहासाने घेतली नसावी.

या काळातील गोमंतकीय मराठी कथालेखनाचे वैशिष्ट्य हे की हे लेखक गोमंतकापासून दूर असलेल्या मुंबई, पुणे या ठिकाणी राहून आपले कथालेखन करीत होते. त्यांच्यावर त्या काळातल्या हरीभाऊ आपटे, ना.ह. आपटे वगैरे कथालेखकांचा प्रभाव होता. त्याचबरोबर कथालेखिका, गिरिजाबाई केळकर, काशीताई कानिटकर वगैरेंचा प्रभाव होता. विषय, तंत्र, शैली इत्यादी सर्वच अंगानी हा प्रभाव ठसठसशीतपणे जाणवतो. अशाप्रकारे गोमंतकीय मराठी कथालेखनाचा पाळणा मुंबई नगरीत हलला असे म्हणावे लागेल. म्हणूनच पुढे त्यांत आलेली पृथगात्मता या लेखनात दिसून येत नाही. लेखक गोमंतकीय परंतु जीवनानुभव मुंबईचा किंवा पुण्याचा असे या कथांचे स्वरूप होते. गोमंतकीय मराठी कथालेखनाचा हा पहिला टप्पा, साधारणतः १९२५ पर्यंत तो चालला. 'करमणूक' ते 'मनोरंजन' या कालखंडातील कथेला ही कथा सर्वार्थाने समांतर व समकालीन राहिली.

या पुढील टप्पा आहे 'रत्नाकर-यशवंत किर्लोस्कर' या मासिकांचा. पैकी 'यशवंत' हे मासिक तर सर्वस्वी कथा या वाङ्मयप्रकाशाच्या अभिवृद्धीकरिता वाहून घेतलेले पहिले मराठी मासिक. या काळात मराठी कथेने कलात्मकतेची नवनवीन रूपे धारण केली. कथेला तंत्राची जाग आली आणि पुढे तर ती अधिकच तंत्रबद्धच झाली. या काळच्या कथेवर स्वच्छंदवाद, व्याजवास्तववाद यांनी आपली अधिसत्ता गाजवलेली ठळकपणे पहावयास मिळते. 'प्रादेशिक कथे' ची अनोखी अपूर्वभेट गोमंतकीय कथेने मराठी कथेला दिली तीही याच काळात. वि.स. सुखटणकर यांच्या कथालेखनाला १९२५ च्या आगेमागे प्रारंभ झाला. आपल्या आगळ्या वेगळ्या लथालेखनाने त्यानी 'आजचे व कालचे गोमंतक' मराठी कथेला भेटविले. इथूनच मराठी कथाविश्वात प्रादेशिक कथेच्या प्रांताला प्रारंभ झाला. सुखटणकरांचे कथाविश्व हे जाणीवपूर्वक निर्माण केलेले होते.

१९३१ मध्ये त्यांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आठ कथांचा संग्रह मुंबईत प्रकाशित झाला. त्यावर ठळकपणे लिहिले होते. 'Eight Regional Stories' आपल्या या कथांतून त्यांनी गोमंतकाचे तन मन समर्थपणे अक्षरबद्ध केलेले आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून मराठी कथा जगतात आलेल्या प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी आपल्या कथालेखनाला १९२९ मध्ये प्रारंभ केला. सुखटणकरांनी मराठीत आणून सोडलेला प्रादेशिकतेचा प्रवाह नित्य जागता आणि खळाळता ठेवण्याचे आजोड कार्य त्यांच्या कथांनी केले. १९३४ मध्ये त्यांचा पहिला कथासंग्रह 'कल्पवृक्षाच्या छायेत' प्रकाशित झाला. तत्पूर्वीच त्यांनी मराठी कथालेखकांच्या पहिल्या पंक्तीचा मान स्वसामर्थ्याने प्राप्त करून घेतला होता. 'यशवंत' मासिकाने घेतलेल्या कथालेखन स्पर्धेत त्यांच्या कथेला द्वितीय पारितोषिकाचा सन्मान प्राप्त झाला होता. लक्ष्मणरावांच्या मागून व्यकटेश अनंत पै रायकर, जयवंतराव सरदेसाई, सा.घ. कंटक, का.पु. घोडे यांच्या कथांना गोव्याबाहेच्या नियतकालिकांतून मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळू लागली. त्यात प्रादेशिकता नावापुरतीच होती. बहुतः ही कथा रंजनप्रधानच होती. पुढे पं. महादेवशास्त्री जोशी यांनी विपुल कथालेखन केले. काही टिकाकारांच्या मते त्यांची कथा प्रादेशिकच आहे. परंतु त्यांची ही कथा पुणेरी जीवनजाणीवांच्या खोड्यात अडकलेली होती. हे आवर्जुन नमूद करावेसे वाटते. खुद्द शास्त्रीबुवा स्वतःला प्रादेशिक कथाकार मानीत नव्हते. या वस्तुस्थितीकडे हे टिकाकार का डोळेझाक करतात हे कळत नाही./

शास्त्रीबुवांचे कथालेखन १९३५ दरम्यान सुरु झाले आणि त्यांचा पहिला कथासंग्रह 'वेलविस्तार' १९४१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर पुढे संस्कृतीकोशाचे कार्य हाती घेईपर्यंत म्हणजेच १९६०/ पर्यंत, त्यांचे एकूण १० कथासंग्रह प्रसिद्ध झाले. नवकथेच्या काळात कथालेखन करणाऱ्या शास्त्रीबुवांचा नवकथेविषयीचा दृष्टीकोनही प्रतिकूलच राहिला. जुनी कथा आणि नवी कथा यांच्या सीमारेषेवरची कथासृष्टी त्यांनी मराठीत फुलवली याची जाणीव कथा अभ्यासकांनी ठेवली पाहिजे असे वाटते. १९४७ ते १९६० याच काळात कविश्रेष्ठ बोरकरांनीही कथालेखन केले. त्यांचा एकमेव कथासंग्रह 'प्रियदर्शिनी' हा १९६० मध्येच प्रकाशित झाला/ गोमंतकातील काही लोककथांना त्यानी कथारुप देऊन आपली वैशिष्ट्यपूर्ण अशी कथा सिद्ध केलेली आहे. या काळातील दुसरे महत्त्वाचे कथाकार म्हणजे बा.द. सातोस्कर त्यांचे कथालेखन अनुवादीत कथांपुरतेच मर्यादित/आहे. त्यांनी काही चांगल्या फ्रेंच व पोर्तुगीज कथांच्या अनुवादाद्वारे मराठी भाषेला त्या भाषेतील कथांचा परिचय करून दिला. उदा.' पंचविशीतले पाप' 'द्राक्षांच्या देशात' वगैरे. अनुवादित क्षेत्रात दुसरे नाव घ्यायचे म्हणजे ज.ज. शिंक्रे यांचे. फ्रेंच कथांचे त्यांचे अनुवाद सरस उतरले आहेत. मात्र समीक्षकांचे म्हणावे तेवढे लक्ष तिकडे गेलेले नाही. अनुवादित साहित्याने कोणतीही भाषाभगिनी संपन्न होते. दुर्लक्षित अशा या कथेच्या प्रातांत उल्लेखनीय भर घालून गोमंतकीय लेखकांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. परंतु साहित्याच्या अभ्यासकांनी अनुल्लेखाने त्यांना मारलेलेच पहावयास मिळते. खरे पहायला गेल्यास वि.सी. गुर्जर, मामा वरेरकर यांच्या तोडीस तोड अशीच ही कामगिरी आहे. उपरोल्लेखित उभय कथाकारांनी 'बंगाली प्रवाह' मराठीत आणला तर सातोस्कर-शिंक्रेनी उत्कृष्ठ पाश्चात्य कथांचा नजराणा मराठीला बहाल केलेला आहे हे विसरून चालणार नाही.

१९४५ च्या दरम्यान सुरु होणारा गोमंतकीय कथेचा तिसरा टप्पा १९६०-६५ च्या दरम्यान संपतो आणि इथून पुढे चौथ्या टप्याला प्रारंभ होतो, तो १९८५-८७ च्या आगेमागे. याच काळात 'गोवा संघप्रदेशाचे' 'गोवा राज्य साकार झाले. १९४५ पासून गोमंतकात कोंकणी भाषेच्या आंदोलनाला प्रारंभ झाला. तसेच १९४६ मध्ये गोव्यात/राम मनोहर लोहियांनी क्रांतीपर्वाचा शुभारंभ घडवून आणला. या क्रांतीपर्वात त्याकाळचे बीनीचे मराठी साहित्यिक सामील झालेले होते. परिणामस्वरूप सरदेसाई, सातोस्कर, बोरकर, शिंक्रे आदि गोवा सोडून मुंबई-पुण्याकडे जाऊन राहिले. त्यांचे चळवळीचे कार्य तेथूनच चालले होते. बरोबरीनेच कथालेखनही चाललेले होते. या काळातील

त्यांचे कथालेखन प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडून जाणे क्रमप्राप्तच होते. या काळच्या त्यांच्या कथामधून वेगळा जीवनानुभव अनुभवावयास मिळतो. परिणामी बऱ्याचशा प्रमाणात गोमंतकीय कथेची पृथगात्मकता ओसरू लागली होती.

१९६१ मध्ये गोवा मुक्त झाल्यावर नवनिर्माणाचे कार्य इथे जोमाने सुरु झाले. शिक्षणप्रसार हा या कार्याचा पाया असावा असे इथल्या नवनियुक्त नेतृत्त्वाने आपले उद्दिष्ट मानले. हे नेतृत्त्व बहुजन समाजातून सिद्ध झालेले होते. परिणाम स्वरूप शिक्षण प्रसार आणि प्रचार याची महाप्रचंड लाटच इथे आली. मराठी भाषेची परंपरा इथे होतीच. तेच प्रमुख माध्यम झाले. परिणामतः प्राथमिक स्तरापासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत अध्यापनाकरिता जो शिक्षक वर्ग इथे नेमला गेला तो प्रायः महाराष्ट्रातून व शेजारच्या बेळगाव, कारवार, सारख्या मराठी भाषिक प्रदेशातून आलेला होता. बेळगाव-कारवारमध्ये संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन त्यावेळी जोरात सुरू होते. गोव्यात आलेल्या या 'गुरुजनांतूनच पुढे अनेकानी गोमंतकीय मराठी साहित्य सेवेला वाहून घेतले. 'गोमंतक' 'नवप्रभा', 'राष्टमत' सारखी वृत्तपत्रे निघाली. त्यासाठी लागणारा 'लेखकू कामगार' हा ही प्रायः याच मराठी भाषिक प्रदेशातून आलेला होता. त्यांनीही आपला वाटा उचलला. नवकथेचे वारे त्यांनीच गोव्यात आणले. अशा तऱ्हेने कालचा हा 'बिगर गोमंतकीय वर्ग' आजचा नवगोमंतकीय आणि उद्याचा 'गोमंतकीय' ठरला. या सर्वांची साहित्यसेवा गोमंतशारदेच्या पायी रूजू झालेली आहे. गोव्यातून परागंदा झालेली लेखक मंडळीही याकाळी गोव्यात परतली आणि आपली लेखणी चालवू लागली. या कालखंडाच्या उत्तरार्धात म्हणजे १९७५-८५ च्या दरम्यान इथल्या बहुजन वर्गातून अनेक सुशिक्षित तरूण पुढे आले आणि त्यांपैकी अनेकांनी लेखणी हातात घेतली. या कालखंडातील गोमंतकीय कथाविश्वावर याची प्रभा पडलेली आहे. चौथ्या आणि पाचव्या कालखंडातील कथेमध्ये पृथगात्मता दाखवणे तसे मोठे अवघड काम आहे. परंतु गोमंतकात राजभाषेच्या प्रश्नावरून तीव्र झालेलें मराठी-कोंकणी आंदोलन आणि विज्ञान व स्त्री- शिक्षणाचा प्रसार यामुळे काही वेगळे तरंग या काळच्या म्हणजे पाचव्या कालखंडातील कथावाङ्मयामध्ये उमटलेले पहावयास मिळतात. ते म्हणजे विज्ञानकथा आणि कथालेखनामध्ये स्त्री लेखिकांच्या संख्येत व गुणात्मकतेत झालेली वृद्धी हे होर्ते. सर्वसाधारणपणे गेल्या शंभर वर्षातील गोमंतकीय मराठी कथा या वेगवेगळ्या पाच विभागात विभागता येतात-त्याचप्रमाणे तीने कांही अंशी प्रत्येक टप्प्यावर कात टाकलेली असली तरीही ती प्रायः रंजनाप्रधानच राहिलेली आहे. असेच म्हणावे लागते.

काहीशा विस्ताराने हा आढावा अशासाठी घेतला की गोमंतकीय कथेच्या या व्यापक परिप्रेक्षाच्या पार्श्वभूमीवर इथली मुक्तीनंतरची कथा, तिच्या विविध प्रेरणा व प्रवृत्ती यांचे सम्यक आलेखन आणि म्हणून मूल्यमापन करणे सुलभ व्हावे. विवेच्य काळातील प्रमुख कथाकार, कथेच्या विविध प्रवृत्ती याविषयीची चर्चा या निबंधात आपपतः अपेक्षितच आहे. परंतु तत्पूर्वी या कालखंडातील कथालेखकांचा धावता आढावा घेणे इथे अप्रस्तुत ठरणार नाही. गोवा मुक्तीनंतर इथे जे कथाकार साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात कार्यरत होते ते सारेच्या सारे एकाच तळावरून निघालेले नव्हते; हे इथे प्रकर्षाने लक्षात घेतले पाहिजे. या लेखकांत गोमंतकीय व नवगोमंतकीय जसे होते तसेच पुरुष व स्त्री लेखकही होते. सरंजामी जीवनपरतीतून आलेले जसे होते तसेच मध्यमवर्गातून आणि बहुजन समाजातून आलेले लेखकही या काळात कथालेखन करीत होते. नानाविध व्यवसायात गुंतलेले जसे होते तसेच विद्यार्थीविश्वातून आलेले लेखकही होते. यापैकी अनेक हवसे, नवसे होते. यातील सातत्याने लिहिणाऱ्या लेखकांचा ही एकही कथासंग्रह प्रकाशित झालेला नाही. त्यांच्या कथा विविध नियतकालिके, अनियमकालिके (उदा. संगम, दुधसागर, मैत्र, गोमंतकाची अस्मिता व दैनिकांचे दिवाळी अंक वगैरे) यांच्या फायलीतून पडून राहिलेले आहे. मुक्तीपूर्व कालखंडात ज्यांनी उत्तम कथाकार म्हणून नाव कमावलेले होते असे लेखकही या काळात कथा लिहित होते. त्यापैकी बऱ्याच जणांच्या मुक्तीपूर्व कथांचे संग्रह याच कालखंडात निघालेले आहेत. काही नावगोमंतकीयांनी मुक्तीपूर्व काळात आपापल्या प्रदेशात

कथालेखनाच्या क्षेत्रात उमेदवारी केलेली होती. त्यापैकी काही जणांनी इथे आल्यावर आपली वेगळी कथा निर्माण केलेली आहे. तर काही जणांनी इथे आल्यावरही आपली पूर्वीचीच घाटणी पुढे चालू ठेवलेली आहे.

मुक्तीनंतर इथे चाललेल्या नवनिर्माणाच्या चळवळींतर्गत अनेक साहित्य,संस्कृती व कला विषयक उपक्रम व चळवळी इथे आकारास आल्या. नवी नियतकालिके निघाली, नवी व्यासपीठे निर्माण झाली, प्रकाशन संस्था निघाल्या. या साऱ्यांचाच इथली कथा विकसित करण्यास हातभार लागलेला आहे, ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. तसेच या कालखंडातील कथेचे सम्यक मूल्यमापन करावयाचे झाल्यास जुन्या कथाकारांची या काळात संग्रह रूपाने प्रकाशित झालेली कथा व नवगोमंतकीयांची या काळात संग्रहीत झालेली जुनी कथा याविषयी टीकाकारांना व समीक्षकांना सतर्क राहिले पाहिजे,असे सुचवावेसे वाटते. न पेक्षा पुढीलांपुढे ठेवला जाणारा कथाआलेख आणि मूल्यमापन/ सुरू राहू शकणार नाही.

मुक्तीपूर्व कालखंडात कथालेखन करणाऱ्या अनेक लेखकांचे कथालेखन या काळात पूर्णपणे थांबलेले होते. मात्र त्यातील कविवर्य बोरकर, जयवंतराव सरदेसाई व्यंकटेश अनंत पै रायकर यांचे कथालेखन अधूनमधून चाललेले होते. याच काळात सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशीची दुसरी आवृत्ती साहित्य अकादमीने प्रकाशित केली. साहित्य अकादमीने प्रकाशित केलेला गोमंतकीय कथाकारांचा हा एकमेव संग्रह आहे. म्हणून त्याचे अनन्यसाधारण महत्व असले तरी त्याचा अभ्यास अप्रस्तुत ठरतो. 'सप्तस्वर' (१९६५), 'सोन्याचा कळस' (१९९०) व 'भावना आणि वासना' (१९९१) असे तीन संग्रह पै रायकरांचे निघालेले आहेत. सा.ध. कटकांच्या 'जाईची फुले' (१९६१) हा संग्रहही याच काळातला आहे. तर का.पु. घोडेंचा 'वन्ही तो चेतवावा' (१९८०) हा संग्रहही याच काळातला. रत्नाकर राव यांचा 'निराळे लोक (१९६६), भालचंद्र मडकईकर यांचा 'सुकेरिया' (१९६१), चंद्रकांत काकोडकर यांचे 'सुंदर हास्यकथा' (१९६२) व 'मूक यौवन' (१९६४) हे संग्रह देखील याच काळी प्रसिद्ध झाले आहेत. लक्ष्मणराव सरदेसाई यांचे 'सोनेरी ऊन' (१९६४),/ जयवंत राव सरदेसाई यांचा 'अवशेष' (१९६४) व वसंत वैद्य यांचा 'अकल्पिता' (१९६२) यांचाही अंशतः समावेश केला जावा. शिवाय लक्ष्मणराव सरदेसाई व पंडित महादेव शास्त्री जोशी या कथाकार द्वयींचे 'वेचक लक्ष्मणराव सरदेसाई' (१९८६) व 'कांचनाची निरांजने' (१९६९) हे निवडक कथांचे संग्रहही याच काळात प्रसिद्ध झालेले आहेत. यातील कथा ही प्रायः उभयतांच्या अन्य जुन्या संग्रहातून आलेली असल्याने त्यांचा विचार या कालखंडात करणे औचित्याला धरून होणार नाही.

विवेच्य कालखंडात कथालेखन करणाऱ्या कथाकारांची संख्या सुमारे पन्नासच्या आसपास आहे. पैकी बऱ्याचजणांचे कथालेखन अगदी अल्प आहे. तर काही सक्षम कथाकारांनी आपले लेखन लगेच थांबवून ते कथेच्या क्षितीजावरून लुप्त झालेले दिसून येतात. सातत्याच्या अभावामुळे त्यांच्या कथेला ना आकार येऊ शकलेला ना त्यांच्या कथांचा एखादा संग्रह प्रकाशित झालेला. परिणामतः त्यांच्या लेखनाबद्दल समीक्षकही अबोलच राहिलेले आहेत. अशा लेखकात अरूण निगळ्ये,सीताराम शेट्ये, चंद्रकांत पार्सेकर, झिलू गांवकर,गजानन मांद्रेकर, बाळकृष्ण कानोळकर, डॉ. सु.म. तडकोडकर, प्रा. अशोक माणगुतकर, मोरेश्वर मराठे, रवींद्र म्हार्दोळकर, गोपाळराव मयेकर, सुरेंद्र सिरसाट, तेजा कामत, सचिन कांदोळकर, मीलींद म्हामल, चंद्रकांत गांवस, रवींद्र धवी, शरद दळवी, विजय सातपुते, शरद नरेश, गोविंद केळकर, प्रभाकर खराडे, मंगला साने, यशोधरा पवार, सुनीता गायतोंडे, सुधा कामत, इत्यादींचा समावेश होतो.

ज्या लेखकांचे एक वा अनेक कथासंग्रह निघाले आहेत त्यांत जयराम कामत, (क्रांतिदूत व अंधारयात्री), ज्ञानेश्वर कोल्वेकर (भोलाग्रामे), विठ्ठल ठाकूर, (भार व आवर्त), गंगाधर महांबरे (नैहर छुटे ही जाये),विठ्ठल गांवस (कॅथरीन), डॉ. श्री. शं. फडके (पद्धुआ),गजानन रायकर (दादुली), भाऊ जया नाईक (दोन रेषा),ज्ञानेश्वर वाडकर (खोड),सुरेश स.





नाईक (रेषा), मोहनदास सुर्लकर (मंगळसूत्र), ज.ज. शिंक्रे (हरवलेली माणसे), गो.वि. वैद्य (कवडसे), वसंत वैद्य (अकल्पिता), भालचंद्र मडकईकर (सुकेरिया व गौडबंगाल), वासुदेव भास्कर नायक (चरकातील चिपाडे), ज्योती कुंकळकर (ओला पदर), अंजली आमोणकर (प्राक्तन). आणि (दुसरी बाजू), कमल वाघ (सोनिया), माधवी देसाई (सागर व धुमारे), नरेश कवडी (बियरची सहा कॅन्स), यशवंत कर्णिक (उरूस आणि इतर कथा), लक्ष्मण पाटील (नवी पहाट व घालमेल), बाबासाहेब सकटे (इमान), बा.सा. पवार (शिरशिरी), ना.बा. रणसिंग (भेगळभिंत). व रा.शा. ग्रामोपाध्ये (एकपात्री), यांचा समावेश होतो. या लेखकांपैकी बऱ्याच जणांनी एक तर कथालेखन पूर्णपणे वा अंशात्मक थांबविलेले आहे. काही जण आज ह्यांतही नाहीत आणि यांपैकी बरेचजण नवगोमंतकीय आहेत.

या कालखंडातील बहुप्रसव लेखक म्हणून प्रल्हाद वडेर (कोणीकडून कोणीकडे, चढण, रक्तखुणा व वीज), मुरलीधर कुलकर्णी (थोरला, /सॅटर्न व पाय नसलेली माणसे) चंद्रकांत माशेलकर (असा एक अभिमन्यू, असूया व सार्थक) मनोहर हिरबा सरदेसाई (रक्तचंदनी वाट, मेघनेच्या काठावर, वैशाली, पनिहारी, भोला, ऐतिहासिक कथा व कथा आणि सत्यकथा) लक्ष्मीदास बोरकर (स्मगलर्सच्या दुनियेत, खुलता कळी खुलेना, चाल एका रुपवतीची, हिप्पींची भंकसगिरी व खुनी नंदकुमारी आणि इतर कथा) गणाधीश खांडेपारकर (गाठोडे, रिकामे मधुघट, कायदा गाढव आहे) पु.शि. नार्वेकर (कलंदर, विघ्नहर्ता, मृगजळ व द्यूतचक्र) वासंती नाडकर्णी (कौमुदी, प्यादी, असही अपत्य व आकाशफूल) इंद्रायणी सावकार (ओळख, अमुरपिका, अय्या हो ऽऽ, आलतू फालतू, 'इष्क, प्रेम, रोमांस्', एकेकाचे नशीब, लश्कराच्या भाकऱ्या, चूकभूल व छोडछाड) यांचा समावेश आहे. सुरेश वाळवे, दासू शिरोडकर, स.शं. देसाई, यांनीही विपूल कथालेखन केलेले आहे. यामध्ये विजय कापडी व सुभाष भेंडे हे आपल्या विनोदी कथालेखनामुळे कथेचे एक वेगळे दालन तयार करतात.

वरील कथाकारांपैकी लक्षवेधव व लक्षणीय कथाकार म्हणून विठ्ठल गांवस, मुरलीधर कुलकर्णी, बाबासाहेब सकटे, विठ्ठल ठाकूर, ना.बा. रणशिंग, गजानन मांद्रेकर, विजय कापडी, परशुराम पाटील, साईदास आपटे, यशवंत कर्णिक, प्रल्हाद वडेर, ज्ञानेश्वर कोलवेकर, जयराम कामत, सुभाष भेंडे, ज्योती कुंकळकर, इंद्रायणी सावकार, वासंती नाडकर्णी यांची नोंद घ्यावीच लागेल, परंतु ज्यांनी आपल्या पृथगात्मकतेने गोमंतकीय मराठी कथाविश्वात स्वतःचे असे आगळे स्थान निर्माण करून एकूणच मराठी कथेलाही मोलाचे योगदान करण्याची क्षमता ज्यांच्या लेखणीत आहे. त्यांत प्रसाद नीलकंठ मळकर्णेकर, हेबळेकर, डॉ. नरेश (कवडी), कापडी, सावकार यांचा अवर्जुन उल्लेख करावाच लागेल.

या कालखंडात जे कथालेखन झाले ते प्रामुख्याने रंजनप्रधान स्वरूपाचेच आहे. परंतु त्याशिवाय विनोदीकथेचे अमाप परंतु सकस पिकही या कालखंडात आलेले आहे. नरेश, वडेरांची नवकथेच्या सांप्रदायातील कथा याच काळात निर्माण झाली. अरूण हेबळेकरांची विज्ञानकथा ही या कालखंडाची विशेष देणगी आहे. विठ्ठल ठाकूरांची जी.ए.ना. अनुसरू पाहणारी कथा सुरू होता होताच थांबलेली पहावयास याच काळात मिळते. मळकर्णेकरांची कथा नव्या प्रादेशिक कथेचे प्रसाद चिन्ह आहे. स.शं. देसाई वगळता ऐतिहासिक कथेच्या प्रांतात कुणी यशस्वी मुलुखगिरी केलेली पहावयास मिळत नाही. ना.बा. रणसिंग, बाबासाहेब सकटे, विठ्ठल गांवस यांची कथा ग्रामीणकथेची मळवाट मळू पाहात असली तरी तिला ग्रामीणकथा म्हणणे धाडसाचेच ठरावे. नाडकर्णी, कुंकळकर, देसाई या लेखिकांनी स्त्रियांच्या व्यथांना आपल्या कथेतून आपापल्यापरी मुखर करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी अजून त्यांना फार दूरचा पल्ला गाठायचा आहे, हे निश्चित. देशीवाद तर इथे परदेशीच झालेला आहे. /

या कालखंडातील कथा ही प्रामुख्याने रंजनवादीच राहिलेली आहे. मग ती जुन्या वळणातील असो वा नव्या. गूढ कथा व विज्ञानकथा यांचा काहीसा क्षीण प्रवाह दृष्टीस पडतो. परंतु त्याने बाळसे धरलेले नाही. इथली नवकथेच्या वळणाने लिहिली

जाणारी कथा देखील किती प्रमाणात 'नव' आहे याचा शोध घेणे आवश्यक आहे. मनोविश्लेषणाच्या नावाने मनोदर्शनाचे जुनेच प्रयोग इथे नव्याने केले जात असलेले पहावयास मिळतात. जुन्या प्रादेशिक कथेचे तर समूळ उच्चाटनच झालेले आहे आणि ग्रामीण कथा इथे 'वानगी 'ला देखील सापडू नये ; याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. स्त्रियांच्या कथेतून किती प्रमाणात स्त्रीवाद येतो हाही एक संशोधनाचाच विषय होऊ शकतो. एकूण मुक्तीनंतरच्या गोमंतकीय मराठी कथालेखनाचे हे स्वरूप आहे.

एकूण सर्वसामान्यपणे स्थिती फारशी समाधानकारण नसली तरी देखील जे काही मोजकेच गुणवंत कथालेखक इथे आहेत, त्यांच्या लेखनाविषयी काही विवेचन करणे भाग आहे. संख्यात्मक लेखन करणाऱ्या आणि गुणात्मक लेखन करणाऱ्या काही मोजक्याच कथालेखकांना/अनुल्लेखाने मारणे योग्य ठरणार नाही. तेव्हा त्यांच्या कथालेखनाचा थोडक्यात परामर्श घेऊन हा निबंधप्रपंच संपवितो.

प्रा. मनोहर हिरवा सरदेसाईंनी मराठी कथेच्या दुसऱ्या कालखंडाच्या प्रारंभाला म्हणजे १९४५ च्या आगेमागे आपल्या कथालेखनाला सुरुवात केली असली तरी कथाकार म्हणून त्यांचा बोलवाला, निदान गोव्यापुरता तरी, झाला तो १९५० च्या पुढेच. 'ज्योत्स्ना' च्या कथालेखन स्पर्धेत (१९३९) त्यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झालेले होते आणि 'यशवंत' 'सत्यकथा "मौज' सारख्या इतर प्रतिष्ठित नियतकालिकांतून त्यांची कथा प्रकाशित झालेली असली तरीही कथाकार म्हणून त्यांची प्रतिमा क्षीणच राहिलेली आहे. एकूण मराठी कथेला सोडाच गोमंतकीय कथेला देखील त्यांनी काही नवे दिले असे नाही. वयपरत्वे त्यांच्या लेखनातील सफाई मात्र वाढलेली दिसून येते. घटनाप्रधानता, रंजनात्मकता, आदर्शवाद आणि बोधनवृत्ती यातून त्यांची कथा कधिही बाहेर पडू शकली नाही. ती रोचक, रंजक असल्यामुळे ते लोकप्रिय कथाकार मात्र जरूर बनले. परंतु त्यांत आवश्यक ती भेदकता ते आणू शकले नाहीत. म्हणूनच प्रा. धवी म्हणतात की "त्यांच्या कथेचा फोकस मानवी मनातील कुरुक्षेत्राकडे नाही. तो बाहेरच्या कुरुक्षेत्रावर आहे."

प्रा. सुभाष भेंडे हे कथेची चांगली जाण व क्षमता असलेले कथाकार. परंतु विनोदी लेखनाच्या धुम धडाक्यात त्यांची कथा कुठे अदृश्य झाली ती समीक्षकांनाही गवसली नाही. समीक्षकांनी त्यांच्या/या संग्रहातील गंभीर प्रवृत्तीच्या उच्चकोटीच्या कथालेखनाकडे कां दुर्लक्ष करावे कांही कळत नाही. अंतरकरांनी त्यांना विनोदाच्या तबेल्यात पाठवले नसते तर मराठीला आपल्या गंभीर कथलेखनाद्वारे त्यांनी निश्चितच चांगला साज चढविला असता. तरीही "विनोदी कथांच्या अंगाने भेण्डे आपल्या सांस्कृतिक समाजजीवनातील अब्रू आणि तिची लक्तरे वेशीवर टांगतात. ते पाहून एकीकडे हसूं येत असतानाच वाचकांना अंतर्मुख करण्याचं दुहेरी व दुधारी कामही भेण्डे कौशल्यानं करतात." असे जे म्हटले आहे ते बरोबरच आहे. परंतु उच्च क्षमता असूनही केवळ विनोदवीर म्हणून गवगवा झाल्याने गंभीर कथालेखनाचा गंभीरपणे विचार करण्यात त्यांनी हयगयच केली, असेच म्हणावेसे वाटते. तरीही समाधान एवढेच की आज ते मराठीतले अव्वल दर्जाचे विनोदी कथालेखक आहेत. त्यांनी मिश्किल शैलीने माणसाच्या वृत्ती प्रवृत्तीचे घडविलेले उपहासात्मक दर्शन वाचकाला सुखद वाटते.

भेण्डेंच्या मागोमाग विजय कापडीने विनोदाची पताका फडकाविण्याचे काम निष्ठेने चालविलेले आहे. आजवर अनेक संग्रहही त्यांच्या नावावर जमा झालेले आहेत. रसिकमान्यते बरोबरच राजमान्यताही त्यांच्या 'विनोदा 'ला लाभलेली आहे. उपरोधिक शैलीतून मानवी स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकत त्यांचा विनोद फुलतो. इंद्रायणी सावकार त्यांच्याही नावावर अनेक विनोदी कथासंग्रह असून आज मराठीत त्या आघाडीच्या विनोदी लेखिका आहेत.

गोमंतकीय कथेच्या क्षेत्रात विज्ञानकथेची लागवड करणारे कथाकार म्हणून प्रि. हेबळेकरांचे नाव आदराने घ्यावे लागते. विज्ञानकथांबरोबरच नवकथाही त्यांच्या नावावर आहेत. 'जो तुम तोडो पिया''सरहाने धरे धरे' 'पाय नसलेली माणसे'

'निर्माल्य' 'अहिल्येची पायरी' अशा अनेक सकस, सरस कथा त्यांच्या लेखणीतून उतरल्या. परंतु नंतरच्या काळात विविध जीवनानुभवांचा धांडोळा घेण्याच्या नादापायी त्यांची कथा सपक व पसरट होत गेलेली आढळून येते. कदाचित याचे कारण डॉ. सावंत म्हणतात तेही असू शकते. की "हबळेकरांच्या अनेक कथा लघुकथेच्या मर्यादा ओलांडून जातात आणि हेबळेकरांची मूलप्रकृत्ती कादंबरीकाराचीच आहे हे सिद्ध करतात." काहीही असले तरी त्यांनी गोमंतकीय कथेच्या बरोबरीने एकूण मराठी कथेच्या गुणवत्तेत भर घातली आहे, हे आपल्याला मान्यच करावे लागेल. रचनेच्या आणि निवेदनाच्या अंगाने त्यांनी केलेल्या शैली/ वैशिष्ट्यपूर्ण व विविध प्रयोगांची नोंद कथासमीक्षकांना घ्यावीच लागेल.

मोजकेच व सकस आणि सरस कथालेखन करणारे दुसरे दिगंतकीर्त गोमंतकीय कथालेखक म्हणून डॉ. नरेश (कवडी) चे नांव घ्यावे लागेल. साठोत्तरी नवकथेचा उत्कृष्ट नमूना म्हणून त्यांच्या कथेकडे बोट दाखविता येते. त्यातून त्यांच्या प्रगल्भ जाणिवांचा जसा साक्षात्कार घडून येतो त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या विविध शैलीप्रयोगांतून कथा या वाङ्मयप्रकारावरील त्यांची पक्की पकड व तिचा सच्चेपणा याची प्रचीतीही येते. अवघ्याच कथा लिहून एकूणच मराठी कथाजगतात 'अजरामर' झालेल्या कथाकारांच्या पंक्तीतला हा कथाकार गोमंतकीय आहे असे सांगताना अभिमान वाटतो. आपल्या आगळ्या वेगळ्या तिरकस, तेढ्या निवेदन शैलीतून त्यांनी घडविलेले अफाट, अभंग जीवनदर्शन मनाला एक प्रकारच्या अनामिक, अकल्पित अनुभुतीचा आनंद मिळवून देते. त्याने प्रारंभी मन प्रसन्न होत असेलही परंतु नंतर..? अशा प्रकारचा सर्वस्वी विचित्र अनुभव आपल्याला भेटवणे हेच या कथेचे अपूर्व श्रेयस आहे.

डॉ. प्रल्हाद वडेर, कुलकर्णी व कर्णिक यांनी नवकथेला अनुसरून केलेले कथालेखन कवडीं प्रमाणे पृथगात्म होऊ शकले नाही. अनेकातील एक असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. किंबहुना त्यांची कथा ही नवकथासदृश्य वा ज्याला कृतकनवकथा म्हणता येईल अशा स्वरूपाचीच अधिक 'चढण' 'वीज' अशा सारख्या वा 'गॉन विथ द विंड' सारख्या एकदोन अस्सल वाणाच्या कथा त्यांनी दिल्या असतीलही, परंतु म्हणून कांही त्यांची कथा नवकथा ठरत नाही. गोमंतकीय मराठी कथाक्षेत्रात त्यांचे असे महत्त्व निश्चित आहे. परंतु एकूण मराठी कथेचा विचार जेव्हा समोर येतो तेव्हा मग आपली खरी कसोटीच लागते.

जयराम कामत, विठ्ठल ठाकूर तसेच ज्ञानेश्वर कोलवेकर ही आणखी कांही वेगळ्या कथाकारांची नावे. परंतु विठ्ठल ठाकूरांच्या कथेने काही अपेक्षा निर्माण करता करतांच त्यांनी आपले लेखन थांबवलेच. का? कारणे कांहीही असोत. परंतु त्यांच्यातील 'क्षमते'ची केवळ नोंद घेण्यापूरतेच आपल्याला त्यांचे नाव आज घ्यावे लागते. त्यामानाने जयराम कामत व ज्ञानेश्वर कोलवेकर, हे सातत्याने लिहितात. 'नाव कमावलेले कथाकार' असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. 'क्रांतिफूल' 'अंधारयात्री' व 'भोलानाथ' या सारख्या कथा त्यांच्या लेखणीतून अकृत्रिमपणे साकार झालेल्या आहेत. त्यांनी आपल्या कथांतून मानवीजीवनाचा घेऊ पाहिलेला वेध लक्षात घेतां या उभयतांकडून अधिक उत्कृष्ट कथालेखनाची अपेक्षा करायला निश्चितपणे जागा आहे, असेच मी म्हणेन. त्यांपैकी वर्षा वाडेकर, सुरेखा र. नाईक, या बहुप्रसवा लेखिका असल्या तरी त्याच त्याच प्रकारच्या आकृत्या काढण्यात त्या गुंतून पडल्याने अखेरीला सापळ्यात (लोकप्रियतेच्या) अडकल्या आहेत. 'ओला पदर' घेवून आलेल्या कुंकळकर आणि 'नाच ग घुमा' फेम माधवीताई देसाई, यांच्याकडून अपेक्षा बाळगायला हरकत नाही. कुंकळकरांनी आणखी थोडे प्रयास घेतले तर त्यांची कथा अधिक वेधक व तरलही होऊ शकेल. गोमंतकीय मराठी कथेत भासत असलेली भाव कोमलता व काव्यात्मकतेची पोकळी त्या भरून काढू शकतील. स्त्रीमनाला बोलते करण्याचे फार मोठे सामर्थ्य माधवी ताई पाशी आहे. त्यांचा सुयोग्य वापर करून त्यांनी आपल्या कथा निर्माण केल्या तर त्यांच्या बंडखोर प्रवृत्तीच्या तेजो झळाळीत स्त्रीवादी कथेच्या मातृवेणा इथे निश्चितच सुरु होतील.

सौ. वासंती नाडकर्णी या आजच्या व कालच्याही इथल्या बहुचर्चित प्रतिभावंत कथालेखिका. त्यांनी आपल्या कथालेखनाला


हे पृष्ठ विनायक स. सुखटणकर
यांना अर्पण

विवेच्च कालखंडातील पहिल्या टप्प्यापासूनच प्रारंभ केलेला आहे. विपुल कथा लेखन करूनही आपला कस टीकवून ठेवला आहे. परंतु नाईलाजाने वस्तुस्थिती नोंदवावी लागते, की त्यांनी आपला कस टीकवून ठेवण्यात त्या यशस्वी ठरल्या असल्या तरी तो कस वृद्धिंगत करण्यात त्या असमर्थ ठरलेल्या आहेत. परिणामतः क्षमता असूनही एक आकाशफूल कोमेजत चालले आहे, असे दृश्य नाईलाजाने पहावे लागते.

कांहीही असले तरी मुक्तीनंतरच्या गोमंतकीय कथालेखनाचे स्वरूप आणि कस हा असा आहे; हे नाईलाजाने का होईना आपणास स्वीकारावेच लागेल. त्यांतही समाधान एवढेच की डॉ. नरेश (कवडी), डॉ. हेबळेकर, सुभाष भेंडे, विजय कापडी यांनी पूर्व सूरीं प्रमाणे मराठी कथेच्या निवडक कथाकारांच्या खंडातून आपल्या कथेला स्थान मिळवून दिलेले आहे. हा गोमंतकीय कथेचाच गौरव आहे. त्यामुळेच म्हणावेसे वाटते की अजून सारेच दीप कांही विझलेले नाहीत.

○○

**"खरी गोष्ट म्हटली म्हणजे पोर्तुगीजांनी गोवा जिंकण्यापूर्वीचा कोणताही कोंकणी वाङ्मयविशेष उपलब्ध नाही. पोर्तुगीजपूर्व गोव्यात वाङ्मय होते खरे; पण ते मराठी किंवा संस्कृत या भाषांत.**

**प्रा. अनंत काकबा प्रियोळकर**

ज्ञानार्क जेथून निजप्रकाश ।
धाडुनियां दूर रहा दिशांस ॥
अज्ञान दोषांधतमास हांकी ।
काळोख त्या आर्यमहीस झांकी ॥

– दत्तात्रेय तुकाराम पणशीकर